Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand Arts, Sardar Dalipsingh Commerce & Science College**

Samarthnagar, Aurangabad.

Date :

# PRESS RELEASE

## डॉ. नितीन अधापूरे यांना "युवा शास्त्रज्ञ पुरस्कार "
## मायक्रोबायॉलॉजिस्टस सोसायटी, इंडिया या राष्ट्रीय संघटनेने घेतली दखल

विवेकानंद महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नितीन अधापूरे यांना मायक्रोबायॉलॉजिस्टस सोसायटीच्या वतीने नुकतेच युवा शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मायक्रोबायॉलॉजिस्टस सोसायटी हि राष्ट्रीय स्तरावरील सूक्ष्मजीवशास्त्र या विषयावर कार्य करणारी संघटना आहे. नागपूर येथे झालेल्या या कार्यक्रमात सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातील उत्तम शिक्षक, उत्तम विभाग, अशी विविध पुरस्कार देण्यात आले. डॉ. अधापूरे यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांची युवा शास्त्रज्ञ या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डॉ. अधापूरे यांना संशोधन कार्याचा दहा वर्षांचा अनुभव असून सूक्ष्मजंतूंच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक कचऱ्यातील धातूंचे विलगीकरण या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केलेले आहे. डॉ. अधापूरे यांचे लेख हे विविध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशित झालेले आहेत. प्रयोगशाळेतील कच-याच्या विल्हेवाटीसाठीची पद्धत या विषयावर त्यांनी एक पेटंट दाखल केलेले असून ते प्रकाशित झालेले आहे. बायोगॅस साठवणुकीसाठी कमी खर्चातील बलून्स त्यांनी तयार केलेले आहेत. कागद आणि पालापाचोळा असा विघटनाला अवघड असणाऱ्या कचऱ्याला सोप्या पद्धतीने विघटन करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. मराठी विश्वकोश निर्मिती साठी लागणारे विज्ञान लेखनही त्यांनी केलेले आहेत. मागच्याच महिन्यात पृथ्वीवरील एका नव्या सूक्ष्मजीवाचा शोधही त्यांनी लावला आहे. स्प्रिंग्जर- नेचर, एल्सविर आणि रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री च्या विविध नियतकालिकांमध्ये प्रकाशित होणाऱ्या संशोधन लेखांचे पुनरावलोकन करण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. नागपूर येथे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक सिद्धार्थ विनायक काणे यांच्या हस्ते डॉ. अधापूरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. अधापूरे यांचे विविध विषयांवर सखोल संशोधन सुरु असून आतापर्यंत ३५ लाखांपर्यंत अनुदान डी. बी. टी. व बिरॅक या शासनाच्या संस्थांकडून प्राप्त झाले आहे त्यांच्या संशोधनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.श्याम शिरसाठ, संस्थेचे प्रशासकीय अधीकारी श्री. प्रभाकर मोरे, उपप्राचार्य डॉ दादाराव शेंगुळे, उपप्राचार्य डॉ राजेंद्र शेजूळ यांचे प्रोत्साहन मिळाले तसेच विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अक्षय शिसोदे, उपाध्यक्ष श्री. अमर शिसोदे, सचिव श्री. श्रीमंतराव शिसोदे, सहसचिव डॉ. यशोद पाटील व कोषाध्यक्ष श्री. तुषार शिसोदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

